सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६/२०१२-१३

महापालिका सभा दिनांक १८/०९/२०१२ करीता.

मंगळवार दि.१८/०९/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.सौ.आयेशा इद्रिस नायकवडी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ यांचेकडून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळा चालविल्या जातात. यापैकी कांही शाळा महानगरपालिकेने स्वतः बांधलेल्या आहेत. कांही शाळा खोल्यांसाठी सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत निधी उपलब्ध झालेला आहे. व त्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतू पूर्वी शाळांना स्वतःच्या खोल्या उपलब्ध नसलेने त्या त्या वेळी खाजगी इमारती किंवा खोल्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या मात्र शाळांना सर्वशिक्षा अभियाना मधून आवश्यक खोल्या उपलब्ध झाल्यामुळे खाजगी भाड्याच्या इमारतीचा वापर बंद झाला आहे. अशा खाजगी इमारतीचा ताबा त्या त्या मालकांना देऊन त्यांचे भाडे देखील आदायगी बंद करावी. मिरज येथील "बेबी आपाजान उर्दुशाळेसाठी" यापूर्वी आलीरजा मशिद स्ट्रस्ट यांचे कांही खोल्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या. आता या शाळेला स्वतःच्या इमारतीत पुरेशा खोल्या असलेमुळे या ट्रस्टच्या खोल्यांचा वापर बंद आहे. तरी, या खोल्या संबंधीत ट्रस्टला परत ताब्यात देणेबाबत आलेला प्रस्ताव.

२. मा.श्री. सलीम अहमदसो सतारमेकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-

हार्डशिप प्रिमियमसाठी "अभय योजना" या सदराखाली दि.३०/०६/२०११ या कट ऑफ डेट ची मुदत संपलेली आहे. परंतू महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास विषयक परवानगी संदर्भात महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने संबंधीत जमिन मालक / संस्था / विकासक यांचेकडून विहीत बाबींच्या अनुषंगाने दंडात्मक शुल्क आकारणी करणेबाबत महासभेने ठराव क्र.१२७ दि.२०/१०/२०१० हा पारित केलेला आहे. हार्डशिप प्रिमियमसाठी यासदराखाली दि.३०/६/२०११ ही कट ऑफ डेट निश्चित केलेली होती. सदर ठरावा सोबतच्या परिशिष्ठ मधील अनुक्रमांक १ व २ या मधील हार्डशिपची तरतूद दि.१/११/२०१० पर्यंत निश्चित कण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत विषयी महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने हार्डशिप प्रिमियमसाठी अभय योजना या सदराखाली व अ.क्र.१ व २ मधील कट ऑफ डेट ची मुदत सरसकट दि.३१/३/२०१३ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत चर्चा होवून निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्ताव.

१४/९/१२

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १४/०९/२०१२.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०९/२०१२

ठराव क्रमांक :- ११९

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.आयेशा इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ यांचेकडून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळा चालविल्या जातात. यापैकी काही शाळा महानगरपालिकेने स्वत: बांधलेल्या आहेत. काही शाळा खोल्यांसाठी सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत निधी उपलब्ध झालेला आहे. व त्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतू पूर्वी शाळांना स्वत:च्या खोल्या उपलब्ध नसलेने त्या त्या वेळी खाजगी इमारती किंवा खोल्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या मात्र शाळांना सर्वशिक्षा अभियाना मधून आवश्यक खोल्या उपलब्ध झाल्यामुळे खाजगी भाड्याच्या इमारतीचा वापर बंद झाला आहे. अशा खाजगी इमारतीचा तावा त्या त्या मालकांना देऊन त्यांचे भाडे आदायगी बंद करावी असे या सभेचे मत आहे.

तरी मिरज येथील "बेबी आपाजान उर्दुशाळेसाठी" यापूर्वी आलीरजा मशिद स्ट्रस्ट यांचे काही खोल्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या. आता या शाळेला स्वत:च्या इमारतीत पुरेशा खोल्या असलेमुळे या ट्रस्टच्या खोल्यांचा वापर बंद आहे. तरी, या खोल्या संबंधीत ट्रस्टला परत ताब्यात देणेस ही सभा मान्यता देत आहे.

याच विषयाच्या अनुषंगाने नगरसेवक संतोष विठ्ठल देवळेकर यांनी दिलेल्या सूचनेनुसार सांगली येथील वॉर्ड क्र.५ ८ येथील शाळा क्र.११ बाबत देखील जागेवर इमारत नसल्याने भाड्ने पडुयाने असलेली जागा संबंधीताना परत देण्यात यावी व त्याचे भाडे बंद करणेत यावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Mable

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

माझेकडे सादरीकरण
दिलेल्या ठराव सन्मा-अतिरिक्त आयुक्तांचे निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

सहा. आयुक्त,
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०१/२०१२

महासभा क्रमांक :- ०६

ठराव क्रमांक :- ११२

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सलीम अहमदसो सत्तारमेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

हार्डशिप प्रिमियमसाठी "अभय योजना" या सदराखाली दि.३०/०६/२०११ या कट ऑफ डेट ची मुदत संपलेली आहे. परंतू महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास विषयक परवानगी संदर्भात महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने संबंधीत जमिन मालक / संस्था / विकासक यांचेकडून विहीत बाबींच्या अनुषंगाने दंडात्मक शुल्क आकारणी करणेबाबत महासभेने ठराव क्र.१२७ दि.२०/१०/२०१० हा पारित केलेला आहे. हार्डशिप प्रिमियमसाठी यासदराखाली दि.३०/६/२०११ ही कट ऑफ डेट निश्चित केलेली होती. सदर ठरावा सोबतच्या परिशिष्ठ मधील अनुक्रमांक १ व २ या मधील हार्डशिपची तरतूद दि.१/११/२०१० पर्यंत निश्चित कण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत विषयी महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने हार्डशिप प्रिमियमसाठी अभय योजना या सदराखाली व अ.क्र.१ व २ मधील कट ऑफ डेट ची मुदत सरसकट दि.३१/३/२०१३ पर्यंत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

के.एस.जी.व्ही.
सदरचे ठराव मा.अभ्युक्तांच्या निर्देशानुसार
आयुक्त कार्यवाही करावी.

सांगली मिरज व कुपवाड शहर
महानगरपालिका.